पुढारी



गडहिंग्लज : येथे रवळनाथ तर्फे त्रिनेत्र महांत महास्वामीजी यांचे स्वागत करताना एम. एल. चौगुले, उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव आदी.

# शिवयोगी महास्वामीजी यांची 'रवळनाथ'ला सदिच्छा भेट

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

सहिष्णुता, एकमेकांवर प्रेम करणे आणि एकमेकांच्या सहकार्यातून पुढे जाणे हीच खरी भारतीय संस्कृती आहे. विश्वस्ताच्या भूमिकेसह सहकारातील आदर्श तत्त्वांबरोबरच भारतीय संस्कृतीचा कृतिशील वसा रवळनाथने जपला आहे, असे गौरवोद्गार श्रीरंगपट्टण-म्हैसूर येथील चंद्रवन आश्रमाचे त्रिनेत्र महांत शिवयोगी महास्वामीजी यांनी काढले.

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील प्रधान कार्यालय सदिच्छा भेटीप्रसंगी ते बोलत होते. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. आरती रिंगणे यांनी स्वागत केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेवर प्राचार्य गटातून राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून नियुक्ती झालेबद्दल यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णीचे प्राचार्य डॉ. बी. डी. अजळकर यांचा महास्वामीजी यांच्या हस्ते सत्कार झाला. यावेळी सर्व अधिकारी, कर्मचारी, सभासद उपस्थित होते. सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. संचालिका उमा तोरगल्ली यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Mar 9, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in